॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

## जनसंपर्क विभाग

जळगाव दि.१८ (प्रतिनीधी) : महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीसाठी मतदान करता यावे म्हणून कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने महाराष्ट्र शासनाच्या अधिसूचनेनुसार मतदानाच्या दिवशी सुट्टी जाहीर केली आहे.

महाराष्ट्रातील सर्व विधानसभा मतदार संघात बुधवार दि. २० नोव्हेंबर रोजी मतदान होणार आहे. मतदानाकरीता शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी अधिकारी यांना मतदानाचा हक्क बजावता यावा यासाठी दि. २० नोव्हेंबर राजी सार्वजनिक सुट्टी जाहीर करण्यात आली आहे अशी माहिती कुलसचिव डॉ.विनोद पाटील यांनी परिपत्रकाद्वारे दिली आहे.

**बातमी नं. २**

जळगाव दि. १८ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात पश्चिम विभागीय राष्ट्रीय सेवा योजना पूर्व प्रजासत्ताक दिन पथसंचलन निवड शिबिराकरीत आलेल्या सात राज्यातील विद्यार्थ्यांकरीता उद्योजकता विकास या विषयावर केसीआयआयएल तर्फे मार्गदर्शन करण्यात आले.

विद्यापीठाच्या केसीआयआयएल तर्फे संचालक प्रा. भूषण चौधरी यांनी विद्यार्थ्यांना राष्ट्रीय विकासात आपले योगदान उद्योजक होऊन द्यावेत असे आवाहन करीत नाविन्यपूर्ण कल्पना कशा प्रकारे नवीन उद्योग / स्टार्ट अप सरु करणेसाठी अंमलात आणू शकतो यावर मार्गदर्शन केले. यावेळी नवी दिल्ली येथील युवा कार्य व क्रीडा मंत्रालय येथील निरीक्षक अशिष चौधरी व आयुषी शर्मा, युवा अधिकारी  सुमंतकुमार यादव, रा.से.यो. संचालक डॉ. सचिन नांद्रे व मुख्य कार्यकारी अधिकारी सागर पाटील उपस्थित होते. यावेळी सहभागी विद्यार्थ्यांसाठी के.सी.आय.आय.एल. नव-कल्पना स्पर्धा -२०२४ चे आयोजन करण्यात आले. प्रास्ताविक सागर पाटील यांनी केले.

या कार्यक्रमासाठी योगेश पाटील, दर्पण साळुंखे, देवेंद्र काळे, विजय शेले यांनी परिश्रम घेतले.

**बातमी नं. ३**

जळगाव दि. १८ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात भाषा  अभ्यास प्रशाळा व संशोधन केंद्रात प्राध्यापक प्रबोधिनी कार्यक्रम दि. १६ नोव्हेंबर रोजी आयोजित  करण्यात आला.

या कार्यक्रमास प्रशाळेच्या डॉ. प्रिती सोनी यांनी हिंदी साहित्यकी विविध विधाएँ या विषयावर व्याख्यान दिले. हिंदी साहित्यातील महाकाव्याचा परिचय देत त्यांनी खंडकाव्याच्या प्रवासा पर्यंत सविस्तर चर्चा केली. त्यांच्या भाषणात पद्य, गद्य, काव्यप्रकार, हिंदी गझल, कवितांमधून विषय आदी विषयांवर प्रकाश टाकला. कार्यक्रमाच्या अध्यक्षीय मनोगतात प्रशाळेचे संचालक प्रा. म.सु. पगारे यांनी हिंदी साहित्यातील गझल व मराठी साहित्यातील गझल यांवर भाष्य केले. यावेळी प्रशाळेतील सर्व शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचलन व आभार प्रतिभा गलवाडे यांनी मांडले.

..........................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ | दिनांक: १८ नोव्हेंबर, २०२४

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी  करीता